# स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड संलग्नित पारंपारिक अनुदानित नॅक मुल्यांकन प्राप्त महाविद्यालयीन ग्रंथालयातील आधुनिक सेवा : एक अभ्यास

**प्रा. गजमल अर्जुन बंडू**
ग्रंथपाल,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
मुखेड जि. लातूर
E-mail :arjunbg94@gmail.com

**डॉ. बालाजी एन. ढाकणे**
प्राचार्य,
कै.सौ. शेषाबाई सीताराम मुंढे महाविदयालय,
गंगाखेड जि. परभणी
E-mail :ssmac.gkd@reddifmail.com

---

***सार :*** *प्रस्तुत पेपरमध्ये संशोधकाने स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड संलग्नित पारंपारिक अनुदानित नॅक मुल्यांकन प्राप्त महाविद्यालयीन ग्रंथालयातील आधुनिक सेवांचा आढावा घेण्यात आला आहे. यासोबतच प्रस्तुत पेपरमध्ये नॅक मुल्यांकन प्राप्त दर्जाची माहिती व संगणकीकरणासाठी उपयोगात आणलेली आज्ञावली याचा आढावा घेण्यात आला आहे. महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये पारंपारिक सेवांबरोबरच आधुनिक सेवा प्रदान केल्या जातात. ज्यामुळे वाचकाला कमीत कमी वेळेत माहिती प्रदान करता येते. त्याचप्रमाणे ग्रंथालयांचे संगणकीकरण करण्यासाठी विविध आज्ञावली उपलब्ध असून कोणकोणत्या आज्ञावलींचा उपयोग करण्यात आला आहे याचा शोध घेण्यात आला आहे.*

***शोधसंज्ञा :*** *आधुनिक सेवा, नॅक, आज्ञावली व संगणकीकरण.*

---

**प्रस्तावना** :

आजचे २१ वे शतक हे माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचे आहे. या स्पर्धेच्या युगात ग्रंथालायानाही आपले स्वरूप बदलणे आवश्यक झाले आहे. पारंपारिक ग्रंथालयांना ऑफलाईन सेवा या ऑनलाईन पद्धतीने देणे गरजेचे झाले आहे.ग्रंथ मागणी, ग्रंथ देव-घेव, ग्रंथसंग्रह पडताळणी, वर्गीकरण, तालीकीकरण, दाखल नोंद करणे व आंतरग्रंथालयीन देवघेव इ. कामे संगणकाधारे केली जातात. ग्रंथालयांचे संगणकीकरण करण्यासाठी संगणक आज्ञावलीचा उपयोग करावा लागतो. तसेच महाविद्यालयांना दर्जा उत्तमपणे टिकवून ठेवण्यासाठी नॅक मुल्यांकन करून घेणे गरजेचे असून त्या दृष्टिकोनातून स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड संलग्नित ७० महाविद्यालयांना नॅक चा कोणता दर्जा प्राप्त झाला आहे याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**व्याख्या :**

“राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद’ ची स्थापना करण्यात आली. नॅक ही विद्यापीठ अनुदान आयोगाची स्वायत्त संस्था आहे. देशातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालये त्यांच्या कामगिरीवरून मूल्यमापन करून अधिमान्यता देणे हे नॅकचे प्रमुख कार्य आहे.”

“ग्रंथालयातील ग्रंथ उपार्जन, तालीकीकरण, नियंत्रण आणि ग्रंथ देवघेव नियंत्रण इ. पारंपारिक कार्याचे संगणकाच्या साहयाने यांत्रिकीकरण करणे म्हणजे ग्रंथालय संगणकीकरण होय.”

**उद्दिष्टे :**

ResearchHub International Journal

१. स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या आधुनिक सेवांचा आढावा घेणे.

२. ग्रंथालय संगणकीकरणासाठी उपयोगात आणलेल्या आज्ञावलीचा शोध घेणे.

**गृहीतके :**

१. स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयातून ई-सुविधा, डिजिटल संदर्भ सेवा, सामान्य प्रश्न, OPAC/WEB-OPAC, ई-मेल या आधुनिक सेवा दिल्या जातात.

२. ग्रंथालय संगणकीकरणासाठी SOUL २.० या आज्ञावलीचा अधिक महाविद्यालयात केला जातो

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून सर्वेक्षण/पाहणी या तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे.

**माहिती संकलन :**

माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली व मुलाखत या साधनाचा उपयोग केला आहे. प्रश्नावलीद्वारे एकूण ८० नॅक मुल्यांकन प्राप्त महाविद्यालयांपैकी ७० महाविद्यालयीन ग्रंथालयांनी प्रश्नावली प्रतिसाद दिलेला आहे. ७० ग्रंथालायांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**सारणी क्र. १**


**आधुनिक सेवांची माहिती दर्शवणारी सारणी**

| अ.क्र. | आधुनिक सेवा | नांदेड विद्यापीठ | |
|---|---|---|---|
| | | संख्या | प्रमाण |
| १. | ई-सुविधा (E-Resources) | ४३ | ६१.४३% |
| २. | संसाधन सामायीकरण (Resource Sharing) | ०९ | १२.८६ % |
| ३. | दूरस्थ प्रवेश (Remote Access) | ०७ | १०.०० % |
| ४. | ओपक (OPAC) | ४३ | ६१.४३ % |
| ५. | वेब-ओपक (WEB-OPAC) | ३८ | ५४.२९ % |
| ६. | डीजीटल संदर्भ सेवा (Digital Ref. Service) | १६ | २२.८६ % |
| ७. | ई-मेल (E-Mail) | ४३ | ६१.४३% |
| ८. | वाचक सल्लागार सेवा (Reader Adv. Service) | ४७ | ६७.१४ % |
| ९. | सामान्य प्रश्न (FAQ) | ७० | १०० % |

**आलेख क्र. १**

Research Hub International Journal

**आधुनिक सेवांची माहिती दर्शविणारा आलेख**




सारणी व आलेख क्र. १ वरून असे आढळून येते की, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ संलग्नित एकूण ७० महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी अनुक्रमे ४३ (६१.४३%) ग्रंथालयांमधून ई-सुविधा, OPAC आणि ई-मेल या आधुनिक सेवा वाचकांना दिल्या जातात. त्याचप्रमाणे संसाधन सामायीकरण व दूरस्थ प्रवेश ही सेवा अनुक्रमे ०९ (१२.८६%) व ०७ (१०.००%) ग्रंथालायामधून दिली जात असल्याच दिसून येते. ३८ (५४.२९%) महाविद्यालयीन ग्रंथालयातून WEB-OPAC ही सेवा उपभोक्त्यांना दिली जाते. डिजिटल संदर्भ सेवा, वाचक सल्लागार सेवा व सामान्य प्रश्न या सेवा देणाऱ्या ग्रंथालयांची संख्या अनुक्रमे १६(२२.८६%), ४७ (६७.१४%) व ७० (१००%) ग्रंथालयातून दिली जात असल्याचे आढळून आले आहे.

**सारणी क्र. २ : संगणकीकरणासाठी उपयोगात आणलेली आज्ञावली**

| अ.क्र. | संगणकीकरण आज्ञावली | नांदेड विद्यापीठ | |
|---|---|---|---|
| | | संख्या | संख्या |
| १. | soul २.० | ४३ | ६१.४३ % |
| २. | LIBMAN | ११ | १५.७१ % |
| ३. | E-Granthalay | १३ | १८.५७ % |
| ४. | Libsys | ०० | ०० % |
| ५. | SLIM | ०० | ०० % |
| ६. | **इतर** | ०३ | ४.२९ % |
| | **एकूण** | **७०** | **१०० %** |

Research Hub International


सारणी क्र. २ वरून असे दिसून येते कि, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ संलग्नित एकूण ७० महाविद्यालयीन ग्रंथालायांपैकी ४३ (६१.४३%) ग्रंथालयात SOUL२.० या आज्ञावलीचा उपयोग केला जातो. ११ (१५.७१%) ग्रंथालयामध्ये LIBMAN या आज्ञावलीचा उपयोग केला जात असल्याचे आढळून आले आहे. E-Granthalay या आज्ञावलीचा वापर करणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १३ (१८.५७%) आहे. इतर आज्ञावलीचा उपयोग ३(४.२९%) महाविद्यालांमध्ये केला जात असून त्या आज्ञावलींची नावे Qualsoft, Library Management आणि Soft-ed ही आहेत. एकूणच सर्वात जास्त प्रमाणत SOUL२.० या आज्ञावलीचा उपयोग सर्वात जास्त ग्रंथालयामधून केला जातो.

**सारणी क्र. ३ : नॅक मुल्यांकन दर्जा प्राप्त महाविद्यालयांची माहिती**

| अ.क्र. | नॅक मुल्यांकन दर्जा प्राप्त महाविद्यालयांची संख्या व प्रमाण | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | A++ | A+ | A | B++ | B+ | B | C | |
| **संख्या** | ०० | ०० | ०५ | १० | १७ | ३३ | ०५ | ७० |
| **प्रमाण** | ००% | ००% | ७.१४% | १४.२९% | २४.२९% | ४७.१४% | ७.१४% | १०० % |

**आलेख क्र. २**

**नॅक मुल्यांकन दर्जा प्राप्त महाविद्यालयांची संख्या दर्शविणारा आलेख**




सारणी क्र. ३ व आलेख क्र २ वरून असे आढळून येते कि, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ संलग्नित एकूण ७० महाविद्यालयांपैकी ३३ (४७.१४%) महाविद्यालयांना नॅकचा B ग्रेड प्राप्त झाला आहे. १७ (२४.२९%)

International Journal

महाविद्यालयांना B+ हा दर्जा मिळाला आहे. B++ हा दर्जा मिळालेल्या महाविद्यालयांची संख्या १० (**१४.२९**%) असून A हा दर्जा ०५ (**७.१४**%) महाविद्यालयांना मिळाला आहे. त्याचप्रमाणे C दर्जा प्राप्त करणाऱ्या महाविद्यालांची संख्या ०५ (**७.१४**%) इतकी असल्याचे दिसून आले आहे.

**निष्कर्ष :**

१. प्रत्येकी ४३ (६१.४३%) ग्रंथालयांमधून ई-सुविधा, OPAC आणि ई-मेल या आधुनिक सेवा वाचकांना दिल्या जातात.

२. ३८ (५४.२९%) महाविद्यालयीन ग्रंथालयातून WEB-OPAC ही सेवा उपभोक्त्यांना दिली जाते.

३. ७० महाविद्यालयीन ग्रंथालायांपैकी ४३ (६१.४३%) ग्रंथालयात SOUL२.० या आज्ञावलीचा उपयोग केला जातो. तर ११ (१५.७१%) ग्रंथालयामध्ये LIBMAN या आज्ञावलीचा उपयोग केला जात असल्याचे आढळून आले आहे.

४. स्वा.रा.ती.म. विद्यापीठ संलग्नित एकूण ७० महाविद्यालयांपैकी ३३ (**४७.१४**%) महाविद्यालयांना नॅकचा B ग्रेड प्राप्त झाला आहे.

**गृहीतक चाचणी :**

१. स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयातून ई-सुविधा, डिजिटल संदर्भ सेवा, सामान्य प्रश्न, OPAC/WEB-OPAC, ई-मेल या आधुनिक सेवा दिल्या जातात. हे गृहीतक सारणी क्र. १ वरून साध्य झाले आहे.

२. ग्रंथालय संगणकीकरणासाठी SOUL २.० या आज्ञावलीचा अधिक महाविद्यालयात केला जातो. हे गृहीतक सारणी क्र. २ वरून साध्य झाले आहे. कारण ७० पैकी ४३ ग्रंथालयांमध्ये या आज्ञावलीचा उपयोग करत असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची :**


- Kumar, P.S.G.(2005) Information Source And Services : Theory & practice, New Delhi : B.R. Publication house, P.P. 193-201
- http://naac.gov.in/images/docs/NAAC/ANNUALReport/2017-18.pdf (Accessed on17/05/2021)
- www.naac.ac.in
- www.srtmun.ac.in


Research Hub International Journal